

अर्पण

बाल लैंगिक शोषणापासून मुक्तिकडे

# अनेक छोट्या चित्रांपासून एक मोठं चित्र

## ही ॲक्टिव्हीटी कोण करू शकतं?

पाच वर्षांची किंवा त्याहून मोठी कोणतीही व्यक्ती.

## ही ॲक्टिव्हीटी तुम्ही केव्हा करू शकता?

जेव्हा आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांनी मिळून काहीतरी करावं असं तुम्हाला वाटतं. जेव्हा एखादी गोष्ट करण्यासाठी कुटुंबातील सर्व लहानथोर व्यक्ती एकत्र जमतात तेव्हा त्यातून मिळणारा आनंद किंवा वाटणारी मजा काही औरच असते.

## हे तुम्ही कसे कराल?

- एक मोठा कोरा कागद आणि चित्रकलेचं साहित्य घ्या.
- जर ही ॲक्टिव्हिटी तुम्ही घरच्यांसोबत किंवा मित्रांसोबत करण्याचा विचार करत असाल तर कागदाचा कोणताही एक कोपरा निवडा आणि आपसात चर्चा न करता त्यावर एक मोठं चित्र काढा. रंग देण्यासाठी तुम्ही कोणतीही साधनं वापरू शकता. फक्त एक लक्षात ठेवा आपल्याला विविध रंग वापरायचे आहेत. हे झाल्यानंतर आता नाना तऱ्हेची रंगीबेरंगी चित्रं असलेला तुमचा कागद तयार आहे!
- चित्र काढताना तुम्हाला काय वाटलं आणि अनेकांच्या छोट्या चित्रांचं मिळून तयार झालेलं हे मोठं चित्र पाहून तुमच्या मनात काय विचार आला यावर ॲक्टिव्हिटी झाल्यानंतर चर्चा करा आणि ग्रुपमधील प्रत्येक सदस्याला बोलण्यासाठी प्रोत्साहन द्या.
- जर ही ॲक्टिव्हिटी तुम्ही एकटे करत असाल तर चित्राच्या खाली तुम्ही तुमचे विचार लिहून काढा.

## ही ॲक्टिव्हीटी तुम्हाला कशा प्रकारे मदत करेल?

- कौटुंबिक नाती सुधारतील, घट्ट होतील, एकमेकांना अजून चांगल्या तऱ्हेने जाणून घेता येईल, तुमच्या विचारांना एक नवी दिशा आणि आयाम प्राप्त होईल.
- एकात्मतेची भावना वाढेल आणि सगळ्यांची साथ असेल तर जगणं किती सुंदर होतं याची जाणीव होईल.

## काय साहित्य लागेल?

कागद, रंग आणि चित्रकलेचं इतर सामान